ePaper

‖ वर्ष - 8 । अंक -177 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

## एकनाथ शिंदेंना जीवे मारण्याची धमकी, 24 वर्षीय तरुणाचा व्हिडिओ व्हायरल!



महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 6 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




## राजकोषीय तूट 2 लाख कोटींवर

# राज्याची आर्थिक तब्येत नाजूक!

### कॅगने घातले झणझणीत अंजन, योजनांना कात्री लागणार?

**। मुंबई । महाईन्यूज**

**आरोप धादांत खोटे असल्याचे सांगत दंड थोपटले होते. लाडकी बहीण योजनेचे निकष बदलणार नाहीत, ही योजना पुढील पाच वर्ष सुरूच राहिल असे ठामपणे सांगितले होते. पण आता भारताचे नियंत्रक आणि महालेखापालांच्या (CAG) अहवालाने तिजोरीचे गुपित उघड केले. कॅगने राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांचा समाचार घेतला. तिजोरीवर आर्थिक बोजा वाढला आहे. राजकोषीय तूट 2 लाख कोटींवर गेल्याचे झणझणीत अंजन कॅगने घातले आहे. त्यामुळे लोकानुनय योजना आणि कल्याणकारी योजनांना कात्री लागण्याचे वा त्यातील निकष बदलण्याची टांगती तलवार आहे. तर दुसरीकडे लाडकी बहीण योजनेला पण या आर्थिक बेशिस्तीचा फटका बसण्याची शक्यता मंत्र्यांच्या वक्तव्यावरून दिसून येत आहे.**




राज्य सरकारच्या जमा आणि खर्चात ताळमेळ नसल्याचे कॅगने म्हटले आहे. कॅगच्या अहवालात राज्याच्या तिजोरीवर आर्थिक ताण आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या अहवालात राज्याच्या आर्थिक बेशिस्तीवर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. हा अहवाल जणू सरकारच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे.

#### राज्याच्या वित्त विभागाची चिंता

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्याच्या वित्त विभागाने राज्याच्या आर्थिक स्थितीवर बोट ठेवले होते. लाडकी बहीण योजनेसाठी त्यावेळी निधीची भार नको, असे मत विभागाने नोंदवल्याची चर्चा होती. पण सत्ताधाऱ्यांनी या सर्व धादांत खोट्या बातम्या असल्याचे आणि राज्याचा अर्थसंकल्प सादर केला, त्याचवेळी लाडकी बहीण योजनेसाठी निधीची तरतूद केल्याचे म्हटले होते. पण आता कॅगच्या अहवालात राजकोषीय तूट 2 लाख कोटींवर पोहचल्याचे उघड झाले आहे.

#### लाडक्या बहिणींची चिंता वाढली

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर सरसकट तिचा फायदा देण्याचे ठरले होते. निवडणूक काळात बुलढाणा येथे सभा झाली असता दोन कोटीच्यावर खात्यांमध्ये पैसे जमा झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. तर पुढील पाच वर्षांपर्यंत ही योजना बंद होणार नसल्याचे आश्वासन त्यांनी दिले होते.


निवडणुकीत लाडक्या बहिणींने महायुतीला भरभरून मतदान केले. आता या योजनेचे निकष बदलण्याची वक्तव्य सरकारमधील मंत्र्यांकडूनच होत आहेत. त्यामुळे लाडकी बहिणीची चिंता वाढली आहे. तर मंत्री माणिकराव कोकाटे यांनी तर एक पाऊल पुढे टाकत दोन योजनांचा लाडक्या बहिणीला लाभ देऊ नका असे मत व्यक्त केले आहे. शेतकरी महासन्मान अथवा लाडकी बहीण योजना यापैकी कोणत्या योजनेचा लाभ घ्यायचे ते बहिणींनी ठरवावे असे वक्तव्य त्यांनी केले.

## मराठीला अभिजात दर्जा मिळाला, मग जीआर कुठे?

### तीनदा स्मरणपत्र पाठवूनही केंद्र सरकारकडून उत्तर नाही

**। बीड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**केंद्र सरकारने मराठीला अभिजात दर्जा जाहीर करून तीन महिने झाले असले तरी अद्यापही त्याचे अधिकृत पत्र अथवा केंद्राचा त्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर केंद्रीय सांस्कृतिक मंत्री व सचिवांना तीनदा स्मरणपत्र देऊन विचारणा करण्यात आली. मात्र उत्तर देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीने केला.**




चळवळीचे प्रमुख संयोजक डॉ. श्रीपाद जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, 24 ऑक्टोबर रोजी संबंधित मंत्रालयाला पत्र पाठवून मराठीच्या अभिजात भाषेसंदर्भात अनेक बाबींची विचारणा करण्यात आली. अभिजात मराठीबाबत करावयाच्या कामांसाठी सरकार किती निधी देणार, त्यातली 2024-25 या वर्षात किती रक्कम देणार, जे दोन आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार या भाषेतील संबंधितांना दिले जातील त्याची कार्यपद्धती काय, त्याच्या नियम अटी काय, त्याबाबत तज्ञ समिती कोण व केव्हा नेमणार, सर्व केंद्रीय विद्यापीठांमधून मराठी भाषा शिकवण्यासाठी जी केंद्र स्थापन करावयाची आहेत त्या बाबतची काय योजना आहे, अशा प्रश्नांची विचारणा केली. ज्या अन्य भाषांना हा दर्जा मिळाला त्यापैकी कोणकोणत्या भाषांची अशी केंद्र कोणकोणत्या केंद्रीय विद्यापीठात स्थापली गेली आहेत, मराठीसाठी जे उच्च दर्जाचे संशोधन केंद्र स्थापले जायचे आहे ते स्थापण्यासाठी केंद्र किती निधी कधी देणार तसेच याशिवाय अन्य काय लाभ आहेत अशी विचारणा डॉ श्रीपाद जोशी यांनी केंद्राच्या संस्कृती मंत्री व सचिव यांच्याकडे केली होती.

> आज तीन महिने उलटूनही, तीनदा स्मरणपत्रे देऊनही सांस्कृतिक मंत्रालयाने या पत्राचे कोणतेही उत्तर दिले नाही. इकडे मराठीला गौरव आणि उंची प्राप्त करून दिल्याबद्दल सर्वदूर चर्चासत्र घेत केंद्राच्या अभिनंदनाची राज्यात लाट तेवढी आणली जात आहे. यातून मराठी भाषिक समाजाने योग्य तो बोध घ्यायला हवा.
>
> –डॉ. श्रीपाद जोशी, संयोजक मराठी व्यापक हित चळवळ.

# कोंडीमुळे पुणेकर त्रस्त झाल्याची कबुली

## प्रशासन ऐकत नसल्याने भाजपचे मंत्री हतबल !

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील पदपथांसह रस्त्यांवर अतिक्रमणांचे प्रमाण वाढले असून, वाहतूक कोंडीमुळे पुणेकर त्रस्त झाल्याची कबुली केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह मंत्री चंद्रकांत पाटील, तसेच भारतीय जनता पक्षाच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी शनिवारी दिली.**



तर, बेकायदा बांधकामे, रस्त्यावरील अतिक्रमणे यांसह शहरातील विकास प्रकल्पांची कामे संथ गतीने सुरू असून, महापालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे गाऱ्हाणे या नेत्यांनी मांडले.पुणे शहरातील समस्या, प्रश्न, विकासकामे याबाबत आढावा घेण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, गणेश बीडकर, श्रीनाथ भिमाले, राजेंद्र शिळीमकर आदी नेते या वेळी उपस्थित होते. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत,'शहरातील समस्यांबाबत महापालिकेला वारंवार सूचना करूनही प्रशासन दुर्लक्ष करत आहे,' असे मोहोळ आणि पाटील यांनी स्पष्ट केले.मोहोळ म्हणाले, 'प्रशासनाच्या मागणीप्रमाणे केंद्र आणि राज्य शासनाकडून पैसे मिळत आहेत. जुलै २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीत विकासकामांची प्रगती आहे, पण ती फार नाही. त्यामुळे महापालिका आयुक्तांबरोबर झालेल्या बैठकीत प्रशासनाला अधिक वेगाने प्रकल्पांची कामे करावीत, अशी सूचना स्पष्टपणे देण्यात आली आहे. बैठक झाल्यानंतर दोन दिवस प्रशासन दक्ष होते आणि कारवाई होते. मात्र, त्यानंतर पुन्हा आधीची स्थिती येते. बांधकाम आणि अतिक्रमण विभागाने संयुक्तपणे कारवाई करून त्याचा अहवाल आम्हाला सादर करावा, पोलिसांच्या मदतीने कारवाईची ठिकाणे निश्चित करा, शहरातील अतिक्रमणांचा विषय आता संपला पाहिजे, यावर आम्हाला कायमचा तोडगा हवा आहे, असे प्रशासनाला सांगितले आहे.''अतिक्रमण आणि रस्त्यावरील वाहतूक हे पुणेकरांसाठी अतिशय संवेदनशील विषय आहेत. यावर प्रत्येक आमदाराने त्याच्या मतदारसंघातील समस्या मांडल्या आहेत. महापालिकेच्या मुख्य सभेने वाहतुकीचा सर्वंकष आराखडा तयार केला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी केली जात नाही, त्याबाबतही प्रशासनाला विचारणा केली. त्यावर प्रशासनाने मेट्रोच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून, नागरिकांच्या सूचना घेऊन हा आराखडा अंतिम केला जाईल, असे सांगितले आहे. शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महापालिका, मेट्रो आणि वाहतूक पोलिसांची एकत्रित बैठक घेणार आहोत,' असे मोहोळ यांनी सांगितले.अतिक्रमण कारवाई करताना कोणाचेही ऐकायचे नाही. आमच्यातील कोणीही अडवायला येणार नाही. आले तर त्यांचेही ऐकायचे नाही.

### सक्षम अधिकाऱ्यांची गरज

अतिक्रमणे काढली नाहीत, पदपथ मोकळे केले नाहीत, तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे मुरलीधर मोहोळ म्हणाले.विकासकामे करण्यासाठी भूसंपादन करावे लागणार आहे. यासाठी राज्य सरकारने निधी द्यावा, अशी प्रशासनाची मागणी आहे. यासाठी मुरलीधर मोहोळ यांना बरोबर घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. यापुढील काळात प्रत्येक महिन्याला शहरातील प्रश्नांवर प्रशासनासोबत बैठक घेणार आहे, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. मुंबईपाठोपाठ विकसित होणारे शहर म्हणून पुण्याकडे पाहिले जाते. अनेक मोठे प्रकल्प पुण्यात सुरू आहेत. त्यामुळे त्यावर नियंत्रण असण्यासाठी त्या दर्जाचे अधिकारी महापालिकेत असणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास हे प्रकल्प रेंगाळून खर्च वाढतो. लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे अतिरिक्त आयुक्तांची पदे भरण्यास विलंब झाला आहे.

# खराडीतील सोसायटीत दूषित पाण्याचापुरवठा

## सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील पाण्याचा पुरवठा केल्याचे उघड

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खराडीतील न्याती ईलसिया सोसायटीत टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या टँकर व्यावसायिकाने दूषित पाण्याचा पुरवठा केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. टँकर व्यावसायिकाने महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील (एसटीपी) पाणी सोसायटीला दिल्यानंतर रहिवाशांना उलट्या, जुलाबाचा त्रास झाला.**



सोसायटीतील नागरिकांनी याबाबत महापालिकेकडे तक्रार दिल्यानंतर ही बाब उघड झाली. याप्रकरणी टँकरने सोसायटीला पाणी पुरवठा करणाऱ्या व्यावसायिकाला चंदननगर पोलिसांनी अटक केली.याप्रकरणी श्रीराम वॉटर सप्लायर्सचे मालक श्रीनिवास रामलू दासरी (वय ४०) याला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महापालिकेच्या बंडगार्डन पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता नितीन जाधव यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे, अशी माहिती चंदननगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांनी दिली.या सोसायटीला महापालिकेकडून पाणी पुरवठा केला जातो. मात्र, रहिवाशांची संख्या विचारात घेता पाणी पुरवठा अपुरा पडत असल्याने सोसायटीने श्रीराम वॉटर सप्लायर्सला टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचे काम दिले होते. त्यानुसार सोसायटीला दररोज ३० ते ३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, श्रीराम वॉटर सप्लायर्सकडून सोसायटीला महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून पाणी पुरवठा करण्यात आला. हे पाणी बांधकामासाठी वापरले जाते. मात्र, श्रीराम वॉटर सप्लायर्सने दूषित पाणी पुरवठा केल्याने सोसायटीतील रहिवाशांना उलट्या, जुलाब, पोटदुखी असे त्रास सुरू झाल्याने त्यांनी महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील मुख्य अभियंता नंदकुमार जगताप यांच्याकडे २३ डिसेंबर रोजी तक्रार दिली. त्यानंतर पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता नितीन जाधव, उपअभियंता अन्वर मुल्ला यांनी सोसायटीला भेट दिली. सोसायटीला टँकरद्वारे होणाऱ्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले.श्रीराम वॉटर सप्लायर्सने ७ ऑक्टोबर ते १७ डिसेंबर या कालावधीत न्याती ईलेसिया सोसायटीत टँकरद्वारे प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरवले.

### पाण्यामुळे आरोग्यविषयक त्रास

या पाण्याचा वापर रहिवाशांनी पिण्यासाठी केल्याने आरोग्यविषयक त्रास झाला. चौकशीत ही बाब उघड झाल्यानंतर पाणी पुरवठा करणारा पाणी पुरवठा करणारा टँकर व्यावसायिक श्रीनिवास दासरीला अटक करण्यात आली. खराडीतील न्याती ईलसिया सोसायटीत ८५० सदनिका आहेत. या सोसायटीला महापालिकेकडून पाणी पुरवठा केला जातो. मात्र, रहिवाशांची संख्या विचारात घेता पाणी पुरवठा अपुरा पडत असल्याने सोसायटीने श्रीराम वॉटर सप्लायर्सला टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचे काम दिले होते. त्यानुसार सोसायटीला दररोज ३० ते ३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

## गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी कारवाई

# गॅस सिलिंडरचा काळाबाजार!

### पोलिसांकडे वर्षभरात 63 गुन्हे दाखल: सिलिंडरची चढ्याभावाने खरेदी-विक्री

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचे पासबुक नसताना एका तरुणाने दोन सिलिंडर मागितले. त्याने रिकामे सिलिंडर सोबत आणलेले होते. दोघांमध्ये बराच वेळ 'हो', 'नाही'चा पाढा सुरू होता. ते पाहून तरुणासोबत आलेला जोडीदार म्हणाला, 'ब्लॅकनेच घ्यायचे आहे. जरा हळू बोलायला पाहिजे. हा हजार रुपयात एक सिलिंडर घेणार. ग्राहकाला तेराशेला देणार. म्हणजे आठशे सहा रुपयाच्या सिलिंडर मागे याला पाचशे रुपये जादा मिळणार. तीनशे रुपये स्वतःकडे ठेवून दोनशे रुपये एजन्सीच्या पोराला देणार, आहे की नाही कमाई.' असे आणि गॅस रिफिलिंगचे प्रकार शहर परिसरात सर्रासपणे होत आहेत. असे प्रकार करणाऱ्यांविरुद्ध गेल्या वर्षभरात पोलिसांनी ६३ गुन्हे दाखल केले आहेत.**



गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाई केली जात असली तरी छुप्या पद्धतीने 'काळाबाजार उद्योग' सुरूच आहे. गॅस शेगडी दुरुस्ती करणाऱ्या दुकानदारांसह काही नागरिक, काही डिलिव्हरी बॉय, तसेच हॉटेल व्यावसायिकही असे प्रकार करत असल्याचे उघड झाले आहे. हा काळाबाजार थांबणार कधी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कारण, लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल, अशा पद्धतीने भरलेल्या सिलिंडरमधून रिकाम्या सिलिंडरमध्ये धोकादायकरीत्या गॅस भरला जातो. चोरून भरलेल्या सिलिंडरची चढ्या भावाने विक्री केली जाते. पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जात असतानाही शहरात अशा रीतीने गॅसचा काळाबाजार सुरू आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या दराच्या तुलनेत व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस सिलिंडरचे दर दुप्पट आहेत. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांकडून छुप्या रीतीने घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा वापर केला जातो. बऱ्याचदा रस्त्यालगत असलेल्या चहा टपऱ्या, खाद्यपदार्थांच्या गाड्यांवरही हे सिलिंडर असतात. यासह उद्योगनगरीत परराज्यातून अनेक कामगार रोजगारासाठी येतात.

> "उपकेंद्र उभारणीबरोबरच ज्या जुन्या वीजवाहिन्या आहेत. त्यांची वेळेत देखभाल दुरुस्ती होणे गरजेचे आहे. फिडरची संख्या वाढवली पाहिजे. त्याची लांबी केल्यास त्यावरचा ओव्हरलोड कमी होईल. त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत होईल.
>
> **- प्रमोद राणे,** उद्योजक.

### असाही अनुभवला प्रसंग

सकाळी नऊ-साडेनऊची वेळ..., गॅस एजन्सी कार्यालयाच्या खिडकीसमोर सिलिंडर रांगेत ठेवून नागरिक कार्यालय उघडण्याची वाट पहात होते. अपेक्षेप्रमाणे भरलेले सिलिंडर असलेला तीनचाकी टेम्पो घेऊन एक जण आला. त्याने कार्यालय उघडले. रांगेनुसार गॅसचे पासबुक घेऊन नोंदणी सुरू केली. त्यानंतर एका मोपेडवर दोन सिलिंडर घेऊन दोघे जण आले. एक जण थेट कार्यालयात गेला.

### ताथवडेत स्फोट; काळाबाजार उघड

देहूरोड-कात्रज बाह्यवळण महामार्गावर ताथवडे येथे एका महाविद्यालयाच्या बाजूच्या मोकळ्या मैदानात काही दिवसांपूर्वी टँकरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरताना गळती होऊन आग लागली होती. त्यामुळे पाठोपाठ आठ ते दहा स्फोट झाले. गॅस टँकरमधून नोझल पाईपद्वारे गॅस काढून बेकायदेशीररीत्या व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून वाढीव दरात गॅसची विक्री केली जात होती.

### पोलिसांची 2024 मधील कारवाई

| महिना | दाखल गुन्हे |
|---|---|
| जानेवारी | ५ |
| फेब्रुवारी | ९ |
| मार्च | ९ |
| एप्रिल | ९ |
| मे | १९ |
| जून | २ |
| जुलै | ०० |
| ऑगस्ट | ०० |
| सप्टेंबर | २ |
| ऑक्टोबर | ४ |
| नोव्हेंबर | ३ |
| डिसेंबर | १ |
| एकूण | ६३ |

> "गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जात आहे. यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे. असे प्रकार आणखी कुठे सुरू असतील तर नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधावा.
>
> **-डॉ. वि शाल हिरे, सहायक पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड**

> "एका सिलिंडरमधून दुसऱ्या सिलिंडरमध्ये बेकायदा गॅस भरणे अत्यंत धोकादायक आहे. अशा प्रकारामुळे दुर्घटनाही घडल्या आहेत. काहीजण पैसे कमविण्यासाठी स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालत आहेत. तरी असे प्रकार रोखण्यासाठी आणखी कठोर कारवाई व्हायला हवी.'
>
> **-राहुल नेवाळे,** नागरिक, चिखली

---

## जलवाहिनीसाठी विद्युत वाहिन्या हटविणार

### महावितरण कंपनीकडे आवश्यक ते शुल्क महापालिकेकडून जमा

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भामा-आसखेड धरणापासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येत आहे. या कामास अडथळा ठरत असलेल्या विविध ठिकाणच्या उच्चदाब व लघुदाब विद्युत वाहिन्या स्थलांतरित करण्यात येणार आहेत. त्यासाठी आवश्यक ते शुल्क महापालिकेकडून महावितरण कंपनीकडे जमा करण्यात आले आहे.**





शहरवासियांची पाण्याची तहान भागविण्यासाठी महापालिका युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. त्यासाठी पहिले पाऊल म्हणून भामा-आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी आणण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टाकीपर्यंत १ हजार ७०० मिलिमीटर व्यासाची भूमिगत मुख्य जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. त्या कामासाठी चाकण-वांद्रा रस्ता व कारंजा विहीर येथे महावितरणच्या उच्च व लघुदाब वीज वाहिन्यांचा अडथळा निर्माण झाला आहे. त्या वाहिन्या स्थलांतरित करण्यासाठी ३९ हजार ६२३ रुपयांचे पर्यवेक्षण शुल्क महावितरणला देण्यात येणार आहे.

ब्रेक प्रेशर टाकीपासून तळवडे - देहूपर्यंत १४०० मिलिमीटर व्यासाची भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येत आहे.

या कामासाठी इंदोरी गाव ते जांबवडे गाव ते जाधववाडी धरण रस्तामार्गे नवलाख उंब्रे येथे उच्च व लघुदाब वीजवाहिन्यांचा अडथळा निर्माण झाला आहे. त्या वाहिन्या हटविण्यासाठी २ लाख ३० हजार ६९१ रुपये पर्यवेक्षण शुल्क महावितरणला देण्यात येणार आहे. हे सर्व शुल्क महावितरणाला अदा करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीमध्ये मंजुरी दिली आहे. त्यानंतर ते शुल्क महावितरणकडे भरण्यात आले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामस्मरण व एकाग्रता

नामस्मरण करताना चित्त एकाग्र का होत नाही ? त्याकरिता काय करावे ? नामस्मरण करीत असताना हजार तऱ्हेचे विचार मनात येतात हे खरे. त्यांना आवरण्याचा पहिला उपाय म्हणजे त्या विचारांच्या मागे न जाणे. विचार मनात आले तर त्या विचारांना फाटे फोडून ते वाढवू नयेत; म्हणजेच मनोराज्य करू नये. विचार येतील तसे जातील, तिकडे लक्ष देऊ नये. चित्त एकाग्र होण्याकरताच नामस्मरणाची गरज आहे. चित्ताची एकाग्रता ही फार पुढची पायरी आहे. चित्त चंचल आहे, त्याला कुठेतरी स्थिर करून ठेवल्याशिवाय भागत नाही, म्हणून ते नामात गुंतवून ठेवावे. नामस्मरण करीत असताना ते नाम आपल्या कानांनी ऐकावे, म्हणजे एकाग्रता व्हायला मदत होईल. एकाग्रता झाल्याशिवाय नाम घेण्यात अर्थ नाही, आणि नामाशिवाय एकाग्रता होणार नाही, या संशयात न पडता साधे, सोपे नाम घ्यावे म्हणजे आपोआप एकाग्रता येईल.

दुसरी गोष्ट अशी की, ज्याची आपल्याला आवड असते त्यात आपल्याला एकाग्र होता येते. आपल्याला विषयाची आवड असते म्हणून विषयाचे सेवन करताना आपण एकाग्र होतो; मग त्याचप्रमाणे विषयाच्या ऐवजी आपण परमात्म्याची आवड धरली तर त्याच्या ठिकाणीही एकाग्र होता येणार नाही का ? म्हणून, आज विषयाची जितकी आवड आहे तितकीच देवाच्या प्राप्तीबद्दलही आवड ठेवावी, म्हणजे आपल्याला त्याच्या ठिकाणी एकाग्र होता येईल. एकाग्र होणे म्हणजे त्या ठिकाणी समरस होणे. मीठ पाण्यात टाकले म्हणजे ते पाण्याहून वेगळे राहते का ? योग केल्याने एकाग्र होता येईल खरे, पण जोपर्यंत समाधी आहे तोपर्यंतच ती एकाग्रता टिकेल. सर्वांभूती भगवद्भाव पाहणे हेच खरे एकाग्रतेचे साधन. सर्व ठिकाणी तोच भरलेला आहे असे समजल्यावर द्वैत कुठे राहिले ? आणि जिथे द्वैत गेले तिथे आपोआप एकाग्रता आलीच. अशी एकाग्रता साधते तीच खरी समाधी होय.

मनुष्य अगदी एकटा असला किंवा एकान्तात असला तरी आपल्या कल्पनेने तो अनेक माणसे आपल्या भोवती गोळा करतो. विशेषत: विद्वान् लोकांना कल्पना जास्त असतात. तेव्हा कल्पना करायचीच तर ती भगवंताविषयी करू या. भगवंत हा दाता आहे, त्राता आहे, सुख देणारा आहे, अशी कल्पना आपण करू या; त्यातच खरे हित आहे. कल्पनेच्या पलीकडे असणारा परमात्मा आपण कल्पनेत आणून सगुण करावा, आणि तिथेच आपले चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करावा.

बोधवचन:- मन एकाग्र होत नसेल तर न होवो, पण नामस्मरण सोडू नये.

# वाचाळ,तोंडाळ सुधीर, थेट मानगुटीवर पडला !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**भारतीय जनता पार्टीचं राजकारण समजायला भल्याभल्यांना दशकं जातात. पक्षा बाहेरच्यांना ते समजणार नाहीचं , पण पक्षासाठी ज्यांनी आयुष्य दिलं, त्यांनाही ते समजणार नाही, किंबहुना, समजण्यापलीकडचं आहे ! ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी किंवा डॉ. मुरली मनोहर जोशी हे बाजूला फेकले गेले त्याचं कारण, त्यांचं वय असं सांगता येईल.. पण, मग उमा भारती, वसुंधराराजे यांच्यासारख्या अनेक बुजुर्ग नेत्यांचं काय ?**

एकेकाळी महाराष्ट्रातले पंकजा मुंडे, विनोद तावडे यांच्यासारखे नेते 'साईड ट्रॅक' झाले होते. पण, त्यांची गाडी हळूच रुळावर आली. ती कशी आली, हा भाग वेगळा, पण एकनाथ खडसेंनी इच्छा व्यक्त करूनही त्यांची गाडी यार्डमध्येच उभी आहे. अशीच अवस्था सध्या सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या नशिबी आली नाही ना, अशी शंका येते ! सुधीरभाऊंच्या मानगुटीभोवती फास आवळला गेला आहे, तो नेमका कशासाठी? याचा उलगडा मात्र होत नाही. पुलाखालून जरासं पाणी गेल्यानंतर तो होईल देखील किंवा त्यांचं पुनर्वसनसुद्धा केलं जाईल. पण, हा नेमका कालावधी किती ? याचा उलगडा मात्र होणं कठीण आहे !

### लबाड राजकारणाला मर्यादा..

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की राजकीय समीकरणात काही काळ एखादा नेता पक्षश्रेष्ठींना किंवा आपल्या जवळच्या नेत्याला अंधारात ठेवून मनासारखा कार्यभाग उरकू शकतो. पण, लबाडपणाच्या अशा राजकारणाला प्रचंड मर्यादा असतात. दूध पिताना मांजराचे डोळे बंद असतात, पण पाहणारा ते पाहत असतो, परिस्थितीचा अंदाज घेत असतो !

अशा या लबाड नेत्याचा अंदाज पक्षश्रेष्ठी नक्की घेत असतात, आणि योग्य वेळ आली की त्याला त्याची जागा दाखवतात, हा भारतीय जनता पार्टीचा इतिहास आहे, ती परंपरा आहे.  एकदा का एखाद्या नेत्याची काम करण्याची धूर्त खेळी, स्वार्थी वृत्ती पक्षश्रेष्ठींच्या लक्षात आली की, कोणत्याही शक्तिशाली नेत्याचे महत्व क्षणार्धात संपवण्यासाठी एखादा अफलातून डाव टाकला जातो. त्यानंतर, अशा बलदंड नेत्यालाही हात चोळत बसण्यापलीकडे हातात काहीही उरलेले नसते.

थोडंसं इतिहासात डोकावलं तर पूर्वी शंकरसिंह वाघेला, मदनलाल खुराणा, कल्याण सिंग यांच्याबाबतीत काय डाव टाकली गेले, ते पाहा, म्हणजे परिस्थितीची



कल्पना येईल. काहींचे ठराविक काळानंतर पुनर्वसन केले जाते, हा सुद्धा आशेचा मोठा किरण आहे, जो कल्याण सिंग यांनी अनुभवला आणि आता विनोद तावडे किंवा पंकजा मुंडे अनुभवत आहेत.

### फाजील आणि उथळ आत्मविश्वास

तर सांगण्याचा मुद्दा, भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार सध्या 'अन्याय झाला,अन्याय झाला' म्हणून ओरडत आहेत, त्यांचेही तेच, ऐकण्या-सांगण्यापलीकडे आहे. त्यांचा सततचा फाजील आणि उथळ आत्मविश्वास एकेकाळी जसा विनोद तावडे,पंकजा मुंडे, एकनाथ खडसे इत्यादींना नडला, तोच आज सुधीरभाऊंच्या नशिबी आला आहे. त्यांची जागा त्यांना दाखवून गेला आहे.पंकजाताई लगेच भानावर आल्या आणि त्यांचा वनवास टळला. त्यांचा एकनाथ खडसे न होता, पुन्हा एकदा पक्षातला आणि सत्तेतला भाव वधारला ! देवेंद्र फडणवीसांचे पंकजाताईनी ऐकायला सुरूवात केली, त्यांच्या मनात काय आहे, हे ओळखण्यास सुरुवात केली आणि आडमुठेपणा किंवा हेकटपणाची भूमिका सोडून दिली, त्यामुळे त्यांचे भले झाले. लक्षात घ्या, याच फडणवीसांनी आधी अख्खे मुंडे कुटुंब बांधले.. जवळ आणले.. त्यानंतर एकाचवेळी दोघा बहीण भावंडांना एकत्र मंत्रिमंडळात स्थान देत वेगळा इतिहास रचला ! नेहमीच काहीतरी सकारात्मक वेगळे करून दाखविण्याचा फडणवीसांचा सर्वांना माहित असलेला स्वभाव आहे, अशा गोष्टी राजकारणात क्वचित आढळतात. थोडेसे सातात्यात डोकावून पाहा. या त्यांच्या स्वभावामुळेच शिवबाचे वंशज देखील फडणवीसांवर जाम फिदा आणि खुश आहेत, प्रचंड समाधानी आहेत. आता मुद्दा मुनगंटीवार यांचा. त्यांनी किमान एकदा तरी कोणतीही दुटप्पी भूमिका न घेता तावडे पद्धतीने नव्हे तर पंकजाताई पद्धतीने फडणवीसांच्या जवळ मनापासून जावे. त्यांचे ऐकावे, त्यांच्या मनासारखे करावे, स्वतःचा बोलघेवडेपणा, तोंडाळपणा थोडासा बाजूला ठेवून मनमानी किंवा मतप्रदर्शन बंद ठेवावे, हा प्रेमाचा सल्ला !

### आपत्तीचे रूपांतर सुवर्णसंधीत?

यानंतर बघा तर काय चमत्कार घडतो ते ! त्यांनादेखील ही राजकीय आपत्ती  नव्हती तर पुढली सुवर्णसंधी होती, हे लक्षात येईल. भलेही मला मंत्री करू नका, पण सुधीरभाऊंना देखील दूर ठेवा..असा आमदार बंटी भांगडीयांचा हट्ट होता. पक्षश्रेष्ठीनी तो ऐकला, असे सध्या म्हणू या. त्यांच्यामुळे मुनगंटीवार यांचे मंत्रिपद हुकले, ही केवळ अफवा ठरावी. कदाचित, ती भांगडीया समर्थकांनी आमदारांचे महत्व वाढविण्यासाठी आपणहून पसरविली असावी. कारण भांगडीयांच्या सांगण्यावरून मुनगंटीवारांचे मंत्रिपद हुकले, यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही. भाजपाचे वरिष्ठ निर्णय घेतांना एवढे हलक्या कानाचे किंवा तकलादू असणे, केवळ अशक्य आहे. सुधीरभाऊंनी सततच्या लबाड पणाच्या आणि उथळ भूमिकेतून आपले महत्व कमी करून घेतले आहे. त्यांच्या राजकारणाला अनेक विविध वादग्रस्त, संशयास्पद, कधी आर्थिक तर कधी राजकीय कंगोरे आहेत, हे भारतीय जनता पार्टीला प्रत्येक कार्यकर्ता जाणतो. आणि देवेंद्र फडणवीसांकडे नुसते गृहखाते नाही तर कुशल प्रशासन आणि तल्लख बुद्धिमत्ताही आहे. म्हणून तर त्यांच्याकडे हल्ली भारतीय जनता पार्टी चाणक्य म्हणून पाहत आहे, हे सुधीरभाऊनाही  माहीत आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018  येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# संपूर्ण देश फुकट जेवण करतो!

## विखेंकडून सुजय विखेंच्या विधानानंतर सारवासारव

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भाजपाचे माजी खासदार सुजय विखे यांनी आज शिर्डीतील एका कार्यक्रमात बोलताना केलेल्या एका विधानामुळे चांगलंच राजकारण तापलं आहे. शिर्डीतील साई संस्थानच्या प्रसादालयात भक्तांना देण्यात येणारे मोफत जेवण बंद करा आणि जेवणासाठी पैसे आकारावे, अशी मागणी सुजय विखे पाटील यांनी केली आहे. पण ही मागणी करत असताना त्यांनी असंही म्हटलं की, ‘संपूर्ण देश येथे येऊन फुकट जेवण करतो, तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील भिकारी येथे गोळा झालेत’, असं विधान सुजय विखे यांनी केलं. मात्र, त्यांच्या या विधानावरून विविध क्षेत्रातून प्रतिक्रिया आल्या आहेत.**



राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुजय विखे पाटील यांच्या विधानावर स्पष्टीकरण दिलं आहे. “सुजय विखे यांच्या विधानाचा विपर्यास करण्यात आला. मी मान्य करतो की साई भक्तांच्या भावना दुखावल्या असतील. पण त्यांचा हेतू तसा नव्हता”, असं म्हणत राधाकृष्ण विखे पाटील यांनी सारवासारव केली आहे. शिर्डीत येणाऱ्या भक्तांना त्या ठिकाणी मोफत प्रसाद मिळाला पाहिजे. पण सुजय विखे यांचं ते वक्तव्य यासाठी होतं की यावर कोणाचंही नियंत्रण नाही. यासंदर्भात काहीतरी नियमावली करावी लागेल. मात्र, साईभक्तांना दिल्या जाणाऱ्या प्रसादावर शुल्क आकरण्याची गरज नाही. प्रसाद भोजन निःशुल्क सुरूच राहिल. तसेच साई संस्थानने जे महाप्रसादाचं काम सुरु केलेलं आहे ते कायम सुरु राहिल”, असं राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं. “शिर्डीत मध्यंतरी भिक्षेकऱ्यांचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यामुळे स्थानिकांच्याही तक्रारी होत्या. नागरिकांच्या तक्रारीला वाचा फोडली पाहिजे म्हणून सुजय विखे यांनी तशी भूमिका मांडली. पण मला वाटंत की सुजय विखे यांच्या विधानाचा विपर्यास झाला आहे. मी मान्य करतो की त्यांनी जो शब्द वापरला त्यामुळे साई भक्तांच्या भावना दुखावल्या असतील. पण खरं म्हणजे त्यांचा तसा हेतू नव्हता”, असं स्पष्टीकरण देत राधाकृष्ण विखे पाटील यांनी सारवासारव केली आहे.साई मंदिरातील प्रसादालयात आपण मोफत जेवण देतो. मात्र, जेवणासाठी २५ रुपये घेतले पाहिजेत. जेवणासाठी पैसे घेतले पाहिजेत. तो पैसा वाचेल तो पैसा मुला-मुलींच्या शिक्षणासाठी खर्च केला पाहिजे. कारण संपूर्ण देश येथे येऊन फुकट जेवण करतोय. संपूर्ण महाराष्ट्रातील भिकारी या ठिकाणी गोळा झालेत. हे योग्य नाही. संस्थानने आपण काय करत आहोत? याचा विचार केला पाहिजे”, असं माजी खासदार सुजय विखे यांनी म्हटलं होतं.भाजपाचे नेते तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुजय विखे पाटील यांच्या विधानावर स्पष्टीकरण दिलं आहे. “सुजय विखे यांच्या विधानाचा विपर्यास करण्यात आला. मी मान्य करतो की साई भक्तांच्या भावना दुखावल्या असतील. पण त्यांचा हेतू तसा नव्हता”, असं म्हणत राधाकृष्ण विखे पाटील यांनी सारवासारव केली आहे. शिर्डीत येणाऱ्या भक्तांना त्या ठिकाणी मोफत प्रसाद मिळाला पाहिजे. पण सुजय विखे यांचं ते वक्तव्य यासाठी होतं की यावर कोणाचंही नियंत्रण नाही. यासंदर्भात काहीतरी नियमावली करावी लागेल.साईभक्तांना दिल्या जाणाऱ्या प्रसादावर शुल्क आकरण्याची गरज नाही. प्रसाद भोजन निःशुल्क सुरूच राहिल. तसेच साई संस्थानने जे महाप्रसादाचं काम सुरु केलेलं आहे ते कायम सुरु राहिल”, असं राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं.त्यामुळे स्थानिकांच्याही तक्रारी होत्या. नागरिकांच्या तक्रारीला वाचा फोडली पाहिजे म्हणून सुजय विखे यांनी तशी भूमिका मांडली.

### भिकारी या ठिकाणी गोळा झालेत

मात्र, साईभक्तांना दिल्या जाणाऱ्या प्रसादावर शुल्क आकरण्याची गरज नाही. प्रसाद भोजन निःशुल्क सुरूच राहिल. तसेच साई संस्थानने जे महाप्रसादाचं काम सुरु केलेलं आहे ते कायम सुरु राहिल”, असं राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं. “शिर्डीत मध्यंतरी भिक्षेकऱ्यांचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यामुळे स्थानिकांच्याही तक्रारी होत्या. नागरिकांच्या तक्रारीला वाचा फोडली पाहिजे म्हणून सुजय विखे यांनी तशी भूमिका मांडली. पण मला वाटंत की सुजय विखे यांच्या विधानाचा विपर्यास झाला आहे. मी मान्य करतो की त्यांनी जो शब्द वापरला त्यामुळे साई भक्तांच्या भावना दुखावल्या असतील. पण खरं म्हणजे त्यांचा तसा हेतू नव्हता”, असं स्पष्टीकरण देत राधाकृष्ण विखे पाटील यांनी सारवासारव केली आहे.साई मंदिरातील प्रसादालयात आपण मोफत जेवण देतो. मात्र, जेवणासाठी २५ रुपये घेतले पाहिजेत. जेवणासाठी पैसे घेतले पाहिजेत. तो पैसा वाचेल तो पैसा मुला-मुलींच्या शिक्षणासाठी खर्च केला पाहिजे. कारण संपूर्ण देश येथे येऊन फुकट जेवण करतोय. संपूर्ण महाराष्ट्रातील भिकारी या ठिकाणी गोळा झालेत.

# पालकमंत्री पदासाठी लोकांचा आग्रह!

## नरहरी झिरवाळांनी थेट जिल्ह्यांची यादीच सांगितली

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटपही झालं. मात्र, सरकार स्थापन होऊन एक महिना झाला तरी अद्याप पालकमंत्री पदाबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. यातच आता महायुतीमधील मंत्र्यांमध्ये पालकमंत्री पदावरून रस्सीखेच सुरु असल्याची चर्चा आहे. कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री पद कोणत्या मंत्र्यांकडे जाणार?**



कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री पद कोणत्या पक्षाकडे जाणार? याबाबत दावे-प्रतिदावे केले जात आहेत. त्यामुळे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासंदर्भातील निर्णय कधी होतो? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे.पण याआधीच भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या मंत्र्यांकडून जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावर दावा सांगण्यास सुरुवात झाली आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री नरहरी झिरवाळ यांनी पालकमंत्री पदासंदर्भात बोलताना मोठं भाष्य केलं आहे. मला नाशिक जिल्ह्याचं पालकमंत्री करण्यासाठी लोकांचा आग्रह आहे. पण मी सांगितलंय की, मला नाशिक जिल्ह्याचं पालकमंत्री पद नको. कारण पुणे, नाशिक हे नागपूरच्याही खूप पुढे विकासाच्या बाबतीत आहेत. विकासाच्या बाबतीत नाशिक तर एक नंबरला आहे. तसेच नाशिक जिल्हा आर्थिक देखील सक्षम आहे. त्यामुळे मी मागणी केली आहे की, मला एक किंवा दोन छोटे-छोटे जिल्हे द्या.

### नंदुरबार द्या, कोणताही जिल्हा द्या

मात्र, आदिवासी जिल्हे द्या”, असं नरहरी झिरवाळ यांनी एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं आहे.झिरवाळ पुढे बोलताना म्हणाले की, “खासदार प्रफुल्ल पटेल यांनी सांगितलं होतं की, मला गोंदिया जिल्ह्याला घेऊन जायचं आहे. गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. आता गडचिरोली जिल्ह्यासाठी भरपूर लोकांची मागणी आहे. मात्र, मी या दोन ते चार जिल्ह्यापैकी मागणी केलेली आहे. तसेच पालघर द्या, ठाणे द्या, नंदुरबार द्या, कोणताही जिल्हा द्या, पण आदिवासींचा जिल्हा द्या. मी आदिवासी आहे म्हणून नाही. पण मी समाजाचं काहीतरी देणं लागतो ते देणं त्यानिमित्ताने परत करण्याची संधी मिळेल.

# केजरीवालांवर 33 कोटींचा खर्च!

## इंडियन एक्सप्रेसच्या बातमीचा हवाला देत मोदींची टीका

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी कॅगचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर राजधानीमध्ये राजकारण चांगलेच तापले आहे. द इंडियन एक्सप्रेसने दैनिकाने कॅगच्या हवाल्याने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या नुतनीकरणावर केलेल्या खर्चाचा तपशील दिला आहे.आता या बातमीचा आधार घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आम आदमी पक्ष आणि पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली आहे. या निवासस्थानावर केलेला खर्च हा 'आप'च्या भ्रष्टाचाराचा नमुना असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी एका जाहीर सभेत म्हटले.**



दिल्लीत भाजपाच्या परिवर्तन मेळाव्यात बोलत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज एका मोठ्या वृत्तपत्रात अरविंद केजरीवाल यांच्या शीश महालवर झालेल्या खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. कॅगच्या अहवालात नमूद केलेल्या आकडेवारीवर ही बातमी आहे. करोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण देश झगडत होता. तेव्हा आम आदमी पक्ष शीश महाल बांधण्यात व्यस्त होता.भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणजेच 'कॅग'च्या अहवालावर आधारित द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीत अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती आणि सुशोभिकरणावर झालेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. नुतनीकरणासाठी सुरुवातीला ७.९१ कोटींचा खर्चाचा प्रस्ताव दिला गेला. मात्र नंतर हा खर्च वाढून २०२० मध्ये तब्बल ८.६२ कोटींची तरतूद करण्यात आली. मात्र २०२२ रोजी जेव्हा नुतनीकरणाचे काम पूर्ण झाले तेव्हा त्याची एकूण किंमत ३३.६६ कोटींवर गेली होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "दिल्लीवर 'आप'दा आणणारे हे लोक केंद्रावर खोटा आरोप करतात की, केंद्र सरकार आम्हाला काम करू देत नाही. केंद्र सरकार पैसे देत नाही. पण हे लोक किती खोटारडे आहेत, याचे उदाहरण यांचा शीश महाल पाहून कळते. आजच एका मोठ्या वृत्तपत्राने शीश महालावर झालेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. करोना काळात दिल्लीतील लोक औषध आणि ऑक्सिजनासाठी झगडत होते, तेव्हा हे लोक आपला शीश महाल बनविण्यात दंग होते."मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवास्थानाचे दरवाजे आणि खिडक्यांना पडदे लावण्यासाठी तब्बल ९६ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. तर किचनमधील उपकरणांसाठी ३९ लाख रुपये खर्च करण्यात आले. टीव्ही कन्सोलसाठी २० लाख ३४ हजार रुपये आणि जिम उपकरणासाठी १८ लाख ५२ हजार रुपये तर कार्पेट बसविण्यासाठी २० लाख ३४ हजार रुपयांचा खर्च करण्यात आला.याशिवाय मिनी बारसाठी ४ लाख ८० हजार रुपये. भिंतींवर मार्बल बसविण्यासाठी २० लाख रुपये देण्याचे मान्य केले होते. परंतु, अंतिम खर्च ६६ लाख ८९ हजार रुपयांवर गेला. मजल्यावर टाइल बसविण्यासाठी ५ लाख ५० हजार रुपये प्रस्तावित होते. परंतु, हा खर्च जवळपास १४ लाखांपर्यंत गेला आहे. नूतनीकरणाच्या दरम्यान, बांधकाम क्षेत्र ३६ टक्के (१,३९७ चौ. मी. पासून १,९०५ चौ. मी. पर्यंत) वाढले आहे. या सर्व गोष्टी नूतनीकरण खर्च वाढण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.

### लोक केंद्रावर खोटा आरोप करतात

दिल्लीत भाजपाच्या परिवर्तन मेळाव्यात बोलत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज एका मोठ्या वृत्तपत्रात अरविंद केजरीवाल यांच्या शीश महालवर झालेल्या खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. कॅगच्या अहवालात नमूद केलेल्या आकडेवारीवर ही बातमी आहे. करोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण देश झगडत होता. तेव्हा आम आदमी पक्ष शीश महाल बांधण्यात व्यस्त होता.भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणजेच 'कॅग'च्या अहवालावर आधारित द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीत अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती आणि सुशोभिकरणावर झालेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. नुतनीकरणासाठी सुरुवातीला ७.९१ कोटींचा खर्चाचा प्रस्ताव दिला गेला. मात्र नंतर हा खर्च वाढून २०२० मध्ये तब्बल ८.६२ कोटींची तरतूद करण्यात आली. मात्र २०२२ रोजी जेव्हा नुतनीकरणाचे काम पूर्ण झाले तेव्हा त्याची एकूण किंमत ३३.६६ कोटींवर गेली होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "दिल्लीवर 'आप'दा आणणारे हे लोक केंद्रावर खोटा आरोप करतात की, केंद्र सरकार आम्हाला काम करू देत नाही.

# उत्तर प्रदेशमध्ये ५० हजार गायींची कत्तल!

## भाजपा आमदाराचा खळबळजनक दावा; सरकारवर आरोप

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशमध्ये गोमांस आणि गायींच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आली आहे. गायींच्या रक्षणासाठी उत्तर प्रदेश सरकारने गोशाळा उभारल्या असून अनेक गोरक्षक गायींच्या संवर्धनासाठी काम करताना दिसतात. मात्र त्याच उत्तर प्रदेशमध्ये योगी आदित्यनाथ यांचे सरकार असतानाही दररोज ५० हजार गायींची कत्तल करण्यात येत आहे, असा खळबळजनक आरोप भाजाचे आमदार नंद किशोर गुजर यांनी केला आहे.**



पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार नंदकिशोर गुजर म्हणाले, "आमचे सरकार असूनही दररोज ५० हजार गायींची कत्तल केली जात आहे. गायींच्या कल्याणासाठी ठरवलेला निधी अधिकारी खाऊन टाकत आहेत.हे प्रकरण मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. अनेक आमदारांनी ही चिंता व्यक्त केली आहे. याबाबत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना माहिती दिली आहे की नाही? याची मला कल्पना नाही. या सर्व भ्रष्ट लोकांचे प्रमुख राज्याचे मुख्य सचिव आहेत. लोणी विधानसभा मतदारसंघात दोन पोलीस शिपायांनी पैसे उकळल्याचा एक व्हिडीओ नुकताच समोर आला होता, असेही ते म्हणाले.भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई केली गेली तर भाजपा पुढील निवडणुकीत ३७५ जागांवर विजयी होईल (४०३ विधानसभांपैकी), असाही दावा आमदार नंदकिशोर गुजर यांनी केला आहे. पण जर भ्रष्टाचार असाच सुरू राहिला तर भाजपा उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला.समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि खासदार अखिलेश यादव यांनी आमदार नंदकिशोर गुजर यांचा व्हिडीओ एक्सवर पोस्ट केला आहे.

### भ्रष्टाचाराच्या पैशांसाठीच ही लढाई सुरु

या व्हिडीओद्वारे अखिलेश यादव म्हणाले की, भाजपामधील अंतर्गत कलहामुळे राज्याच्या सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे.उत्तर प्रदेश भाजपामध्ये आता आपापसातच आरोप-प्रत्यारोप होत आहेत. भाजपाचे मंत्री, भाजपाचे आमदार यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून कुणीतरी भाजपाचाच नेता दूरवरून निशाणा साधत आहे. या सत्ता संघर्षात जनता आणि प्रशासनाची मात्र ससेहोलपट होत आहे. या सत्ता संघर्षात अधिकारी स्वतःची पोळी भाजून घेत आहेत. भ्रष्टाचाराच्या पैशांसाठीच ही लढाई सुरू आहे.

# राशाच्या जबरदस्त डान्सने वेधलं लक्ष

बॉलीवूडच्या कलाकारांची मुलं आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळत आहेत. २०२३मध्ये शाहरुख खानची मुलगी सुहाना खान, अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा, श्रीदेवींची मुलगी खुशी कपूर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर गेल्या वर्षी आमिर खानचा मुलगा जुनैद खानने 'महाराज' चित्रपटाच्या माध्यमातून इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं. आता रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या पहिल्या-वहिल्या चित्रपटातील गाणं प्रदर्शित झालं असून तिच्या जबरदस्त डान्सने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. नेटकरी रवीना टंडनच्या मुलीची तुलना सुहाना खान, खुशी कपूरसह कतरिना कैफबरोबर करत आहेत.

रवीना टंडनच्या १९ वर्षीय मुलीचं नाव राशा थडानी आहे. ती 'आजाद' या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी तयार झाली आहे. याच चित्रपटातील तिचं पहिलं गाणं 'उई अम्मा' प्रदर्शित झालं आहे. या गाण्यावर राशाचा डान्स पाहून नेटकरी भरभरून कौतुक करत आहेत. तिने आपल्या डान्ससह हावभावाने सगळ्यांची मनं जिंकली आहेत.राशा थडानीचं 'उई अम्मा' गाणं ४ जानेवारीला प्रदर्शित झालं. मधुबंती बागने हे गाणं गायलं असून अमित त्रिवेदीने संगीतबद्ध केलं आहे. तर अमिताभ भट्टाचार्य गीतकार आहेत. या गाण्यातील जबरदस्त डान्समुळे राशा चांगलीच भाव खाऊन गेली आहे.

# रिचा चड्ढा लेकीबद्दल सांगत म्हणाली!

बॉलीवूडच्या लोकप्रिय जोड्यांपैकी एक म्हणजे रिचा चड्ढा आणि अली फैजल. बरीच वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर २०२०मध्ये रिचा आणि अलीने नोंदणी पद्धतीने लग्न केलं. त्यानंतर दोन वर्षांनी २०२२मध्ये दोघांनी कुटुंब आणि मित्र मंडळींसह लग्नाचं सेलिब्रेशन केलं. गेल्या वर्षी रिचा आणि अली पहिल्यांदाच आई-बाबा झाले. रिचाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. दोघांनी ही आनंदाची बातमी सोशल मीडियाद्वारे चाहत्यांबरोबर शेअर केली होती. पण, रिचा-अली आपल्या चिमुकल्या लेकीशी कसा संवाद साधतात आणि तिच्यासाठी नेहमी कोणतं गाणं गात असतात हे तुम्हाला माहितीये का? तर जाणून घ्या...अभिनेत्री रिचा चड्ढा आणि अली फैजल या दोघांनी मिळून प्रोडेक्शन हाउस सुरू केलं आहे. याच प्रोडक्शन हाउसचा पहिला चित्रपट 'गर्ल्स विल बी गर्ल्स'ची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. हा चित्रपट 'प्राइम व्हिडीओ'वर प्रदर्शित झाला आहे. याच चित्रपटानिमित्ताने रिचा आणि अली माध्यमांशी संवाद साधताना दिसत आहेत. नुकतंच दोघांनी 'इंडियन एक्सप्रेस'शी बातचित केली. यावेळी त्यांनी चिमुकल्या लेकीबद्दल सांगितलं.'इंडियन एक्सप्रेस'च्या मुलाखतीमध्ये रिचा आणि अलीला विचारलं की, तुम्ही मुलीबरोबर कुठल्या भाषेत संवाद साधता? आणि तिच्यासाठी कोणतं गीत गाता? तेव्हा रिचा चड्ढा म्हणाली, "आम्ही सध्या तिच्याशी काहीही बोलत असतो. कारण आता आमची मुलगी 'गुगु गागा' करत आहे. तसंच 'कौन है वो चॉकलेट का डॉगी?'

# बिपाशा कमवते करोडो रुपये



आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया. बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे. जर तिच्या कार कलेक्शनबद्दल सांगायचं झालं तर, बिपाशाकडे ऑडी क्यू, 25 लाख किमतीच्या फोक्सवॅगन बीटल आणि 28 लाख किमतीच्या टोयोटा फॉर्च्युनर सारख्या आलिशान कार आहेत. आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले.

# पतीसह साध्या लूकमध्ये दिसली भूमिका चावला



सतीश कौशिक दिग्दर्शित आणि जैनेंद्र जैन लिखित 'तेरे नाम' चित्रपट २००३ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला. यामध्ये बॉलीवूडचा भाईजान सलमान खान आणि अभिनेत्री भूमिका चावला यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपटातील अनेक गाणी आजही सोशल मीडियावर लोकप्रिय आहेत. इतकंच काय तर, सलमानच्या केसांची या चित्रपटात विशिष्ट हेअरस्टाइल होती. 'तेरे नाम' प्रदर्शित झाल्यावर भाईजानच्या अनेक चाहत्यांनी अगदी तशीच हेअरस्टाइल करायला सुरुवात केली आणि कालांतराने सर्वत्र या लूकला 'तेरे नाम' हेअरस्टाइल म्हणून ओळख मिळाली.'तेरे नाम'मध्ये सलमान खानने 'राधे' ही भूमिका साकारली होती. स्वभावाने अतिशय हिंसक, बिघडलेला, बेरोजगार मुलगा 'राधे मोहन' अशी ही व्यक्तिरेखा होती. हा राधे, निर्जरा भारद्वाजच्या प्रेमात पडतो. तिचे वडील मंदिरात पुजारी असतात. निर्जरा अतिशय साधीभोळी असते. याच साध्याभोळ्या आणि प्रामाणिक अशा निर्जराची भूमिका चित्रपटात भूमिका चावलाने साकारली आहे.

# भस्म आरतीमध्ये तल्लीन झाली 'अनुपमा'!



टिव्ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय शो म्हणजे 'अनुपमा'. या मालिकेमुळे अभिनेत्री रुपाली गांगुली घराघरात पोहचली. तिला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आज प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली उज्जैन बाबा महाकालच्या भस्म आरतीमध्ये सहभागी झाली होती. आरतीनंतर रुपालीने गर्भगृहात जाऊन महाकालचे आशीर्वाद घेतले. सध्या रुपालीचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. एएनआयने सोशल मीडियावर रुपालीचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती भक्तांसह बाबा महाकालच्या भक्तीत तल्लीन झाली. रुपालीने देवाचे आशीर्वाद घेतले आणि त्यांचे आभार मानले. आज सकाळी रूपाली गांगुली भगवान महाकालच्या मंदिरात पोहोचली होती. तिथे तिने 'भस्म आरती'मध्ये भाग घेतला आणि भगवान महाकालचे आशीर्वाद घेतले. याआधीही 2024 मध्ये रुपाली गांगुली उज्जैनला गेली होती. यावेळी मिडियासोबत बोलताना रुपालीने सांगितले की, ती महाकालच्या दर्शनासाठी अनेकदा गेली आहे. त्याच्या आशिर्वादानेच तिला तिच्या क्षेत्रात यश मिळाले आहे. ती महादेवाची मोठी भक्त आहे. अभिनेत्री पुढे म्हणाली की, '2020 मध्ये मी पहिल्यांदा इथे आले आणि इथेच मला 'अनुपमा' या मालिकेत काम करण्याची ऑफर मिळाली. आता मी महादेवाकडे काही मागायला नाही तर त्यांचे आभार मानायला आली आहे.' त्यानंतर रुपालीने इंस्टाग्रामवर स्टोरीमध्ये तिचा एक फोटो शेयर केला ज्यात तिने कॅप्शनमध्ये जय महाकाल असे लिहिले होते. रुपाली गांगुली एक उत्तम अभिनेत्री आणि थिएटर कलाकार आहे. 'अनुपमा' या मालिकेपूर्वी 'सारा भाई वर्सेस सारा भाई' या मालिकेत दिसली होती. आता रुपालीला बरेच लोक अनुपमा या नावाने ओळखतात. टिव्ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय शो म्हणजे 'अनुपमा'. या मालिकेमुळे अभिनेत्री रुपाली गांगुली घराघरात पोहचली. तिला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आज प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली उज्जैन बाबा महाकालच्या भस्म आरतीमध्ये सहभागी झाली होती. आरतीनंतर रुपालीने गर्भगृहात जाऊन महाकालचे आशीर्वाद घेतले. सध्या रुपालीचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. एएनआयने सोशल मीडियावर रुपालीचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती भक्तांसह बाबा महाकालच्या भक्तीत तल्लीन झाली. रुपालीने देवाचे आशीर्वाद घेतले आणि त्यांचे आभार मानले. आज सकाळी रूपाली गांगुली भगवान महाकालच्या मंदिरात पोहोचली होती. तिथे तिने 'भस्म आरती'मध्ये भाग घेतला आणि भगवान महाकालचे आशीर्वाद घेतले. याआधीही 2024 मध्ये रुपाली गांगुली उज्जैनला गेली होती. यावेळी मिडियासोबत बोलताना रुपालीने सांगितले की, ती महाकालच्या दर्शनासाठी अनेकदा गेली आहे.

# सुनील गावस्कर चांगलेच संतापले!

## भारतीय संघाच्या कामगिरीने सर्वांनाच निराश केले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताने ऑस्ट्रेलियामध्ये खेळवली गेलेली बॉर्डर गावस्कर ट्रॉफी मालिका १० वर्षांनी गमावली. भारताच्या कसोटी मालिकेतील पराभवानंतर माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर चांगलेच संतापले आहेत. गावस्करांनी कोणाचंही नाव न घेता संपूर्ण भारतीय संघावर ताशेरे ओढले आहेत. संपूर्ण मालिकेत भारतीय संघाच्या कामगिरीने सर्वांनाच निराश केले. भारताने प्रत्येक सामन्यात चांगलं पुनरागमन केलं पण विजय मिळवण्यात मात्र अपयशी ठरले.**





सुनील गावस्कर यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ते टीम इंडियाच्या खेळाडूंना सुनावताना दिसत आहेत. टीम इंडियाच्या मालिका पराभवानंतर सुनील गावस्कर यांनी स्टार स्पोर्ट्सशी संवाद साधताना म्हटलं, "आम्ही कोण? आम्हाला क्रिकेटबद्दल काही माहित नाही. आम्ही फक्त टीव्हीसाठी बोलतो आणि पैसे कमवतो, आमचं ऐकू नका, आम्ही कोणीच नाही. एका कानाने ऐका, दुसऱ्या कानाने सोडून द्या."सुनील गावस्करांच्या या वक्तव्यावरून त्यांनी रोहित शर्माला सुनावल्याचं चाहते म्हणत आहेत. सिडनी कसोटीच्या दुसऱ्या दिवशी रोहित शर्मने स्टार स्पोर्ट्सशी संवाद साधला. त्याने कोणाचंही नाव न घेता माजी क्रिकेटपटू आणि पत्रकारांवर वक्तव्य केलं होतं. रोहित म्हणाला होता की, "जे आत माईक, लॅपटॉप किंवा पेन घेऊन बसले आहेत ते ठरवणार नाहीत की आम्ही काय करायचं. काय बरोबर आणि काय चूक हे आम्हालाही कळतं. मी दोन मुलांचा बाप आहे, त्यामुळे मला काय करायचं आहे, याची थोडीफार कल्पना आहे."ऑस्ट्रेलियाविरुद्ध मेलबर्न येथे सुरू असलेल्या चौथ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सुनील गावस्कर यांनी यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतला बेजबाबदार शॉट्स खेळल्याबद्दल खडसावले होते. ऋषभ पंतने हा शॉट खेळला तेव्हा टीम इंडियाला मोठी भागीदारी करणं आवश्यक होते. सुनील गावस्कर यांनी ऋषभ पंतला सुनावत म्हटलं, 'मूर्खासारखा फटका' खेळला आहे. सुनील गावस्कर यांच्या मते, ऋषभ पंतने अशा वेळी विकेट गमावली जेव्हा संघाला त्याची सर्वात जास्त गरज होती. भारताच्या मालिका पराभवावरील वक्तव्याप्रमाणे सुनील गावस्करांचं ऋषभ पंतवरील वक्तव्य असलेला व्हीडिओही व्हायरल झाला होता. सुनील गावस्करांनी पंत बाद झाल्यानंतर कॉमेंट्री करताना म्हटलं होतं, मूर्ख मूर्ख मूर्ख! तुझ्यासाठी तिथे दोन फिल्डर उभे केले आहेत आणि तरीही तू तिथेच फटका खेळला. तुझा आधीचा फटका चुकला होता आणि आता तू कुठे बाद झाला आहेस बघ. तू डीप थर्ड मॅनवर झेलबाद झाला आहेस. बॉर्डर गावस्कर ट्रॉफी गमावल्याने भारतीय संघाचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्याचे स्वप्न अधुरं राहिलं आहे. बाराा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी सिडनी कसोटीत विजय मिळवणं महत्त्वाचं होतं. पण भारताने सिडनी कसोटी ६ विकेट्सने गमावली आणि परिणामी ऑस्ट्रेलियाचा संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरीसाठी पात्र ठरला.सुनील गावस्कर यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ते टीम इंडियाच्या खेळाडूंना सुनावताना दिसत आहेत. टीम इंडियाच्या मालिका पराभवानंतर सुनील गावस्कर यांनी स्टार स्पोर्ट्सशी संवाद साधताना म्हटलं, "आम्ही कोण? आम्हाला क्रिकेटबद्दल काही माहित नाही.

### मी दोन मुलांचा बाप आहे

आम्ही फक्त टीव्हीसाठी बोलतो आणि पैसे कमवतो, आमचं ऐकू नका, आम्ही कोणीच नाही. एका कानाने ऐका, दुसऱ्या कानाने सोडून द्या."सुनील गावस्करांच्या या वक्तव्यावरून त्यांनी रोहित शर्माला सुनावल्याचं चाहते म्हणत आहेत. सिडनी कसोटीच्या दुसऱ्या दिवशी रोहित शर्मने स्टार स्पोर्ट्सशी संवाद साधला. त्याने कोणाचंही नाव न घेता माजी क्रिकेटपटू आणि पत्रकारांवर वक्तव्य केलं होतं. रोहित म्हणाला होता की, "जे आत माईक, लॅपटॉप किंवा पेन घेऊन बसले आहेत ते ठरवणार नाहीत की आम्ही काय करायचं. काय बरोबर आणि काय चूक हे आम्हालाही कळतं. मी दोन मुलांचा बाप आहे, त्यामुळे मला काय करायचं आहे, याची थोडीफार कल्पना आहे."ऑस्ट्रेलियाविरुद्ध मेलबर्न येथे सुरू असलेल्या चौथ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सुनील गावस्कर यांनी यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतला बेजबाबदार शॉट्स खेळल्याबद्दल खडसावले होते.

# गंभीरने सॅम कॉन्स्टासला सुनावले खडे बोल!

## उस्मान ख्वाजा विनाकारण वेळ काढत होता. गौतम गंभीर भडकला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सिडनी कसोटीतील पहिल्या डावात सॅम कॉन्स्टास आणि जसप्रीत बुमराह यांच्यातत वाद झाला होता. कॉन्स्टासने काहीच कारण नसताना मुद्दाम बुमराहशी वाद घातला आणि वेळ काढू पाहत होता. नेहमी शांत असणारा बुमराहही यादरम्यान वैतागलेला दिसला. आता बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या अखेरच्या सामन्यानंतर भारतीय संघाचे कोच गौतम गंभीर यांनी यावर उत्तर दिलं आहे.**





जसप्रीत बुमराहशी वाद घालणारा ऑस्ट्रेलियन युवा क्रिकेटर सॅम कॉन्स्टासवर टीका करताना गंभीरने भारतीय कर्णधाराशी त्याला वाद घालण्याची गरज नसल्याचे म्हटले आहे. सिडनी कसोटीनंतरत्या पत्रकार परिषदेत सॅम कॉन्स्टासच्या या कृतीवर भारतीय खेळाडूंच्या आक्रमक प्रतिक्रियेबद्दल त्याला विचारले असता तो म्हणाला, "हा कठीण खेळ आहे जो तितक्याच ताकदीच्या खेळाडूंमध्ये खेळवला जातो. तिथे तुम्ही नरमाईने गोष्टी घेऊ शकत नाही. मला वाटत नाही की यात काही धमकवण्यासारखं होतं. उस्मान ख्वाजा जेव्हा विनाकारण वेळ काढत होता तेव्हा त्याला जसप्रीत बुमराहला काही बोलण्याचा अधिकार नव्हता. कॉन्स्टासचं यामध्ये काही घेणं देणं नव्हतं. ते पंचांचं काम होतं."गौतम गंभीरने यानंतर विराट कोहली आणि सॅम कॉन्स्टास यांच्यात मेलबर्न कसोटीत झालेल्या धक्काबुक्कीवरही वक्तव्य दिले. यावर बोलताना गंभीर म्हणाला, "माझ्यामते आता जे काही घडलं ते आता घडून गेलं आहे आणि या खेळामध्ये अशा गोष्टी घडत असतात.

### भारताचा 6 गडी राखून पराभव

मला नाही वाटतं अशा गोष्टींचा मोठा मुद्दा करण्याची गरज आहे. कसोटी मालिकेत ही काही पहिल्यांदा घडलेली घटना नाही. अशा घटना मागेही घडल्या आहेत, अनेक ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी पूर्वी अशा गोष्टी केल्या आहेत."ऑस्ट्रेलियाने रविवारी सिडनी कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारताचा ६ गडी राखून पराभव करत पाच सामन्यांची बॉर्डर-गावस्कर मालिका ३-१ अशी जिंकली आणि जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत त्यांचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे.